बीड । सोमवार
०९.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ६९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदाय



# माऊली दादाच्या जयघोषात शिवमहापुराण कथेस सुरुवात

## पहिल्याच दिवशी ३ लाख पेक्षा जास्त भाविक उपस्थित

### मंत्री पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती







- ५ लाख स्वेअर फुटचा वॉटर प्रूफ मंडप
- ५ लाख भाविक बसतील अशी व्यवस्था
- आजुबाजुच्या गावातून येणार भाकरी
- बंदोबस्तासाठी ३०० पोलिसांचा फौजफाटा
- ३ हजार स्वयंसेवक भक्तांच्या सेवेसाठी झटणार
- नुकती, भाजी, भात, चपातीचा महाप्रसाद
- आस्था आणि बाळनाथ संस्थानच्या यू ट्युब चॅनलवर लाईव्ह दिसणार
- वाहनांच्या पार्किंगसाठी ३५ ते ४० एकर जागा
- दवाखाना, ॲम्ब्युलन्स आणि डॉक्टर २४ तास राहणार
- पिण्याच्या पाण्यासाठी ४५ टँकर ७०० स्वच्छतागृह, ३०० जनरेटर
- नेकनूरचे मंगल कार्यालय, येळंब जि.प.शाळा, बळवंतराव कदम महाविद्यालय, चाकरवाडी जि. प. शाळा, मेटे साहेबांची शाळा या ठिकाणी भाविकांसाठी राहण्याची व्यवस्था
- महाराष्ट्रासह परराज्यातूनही येणार भाविक
- संपूर्ण परिसरात सीसी टीव्हीद्वारे निगराणी
- मंडप परिसरात ४५ एलईडी
- स्वयंपाकासाठी ५०० आचारी
- दररोज सकाळपासून २४ तास सुरु राहणार अन्नदान

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यात प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस प्रचंड जनसमुदायांच्या उपस्थित.

माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व ह.भ.प. नारायण महाराज भाऊ यांच्या हस्ते शिवमहापुराण ग्रंथ पूजन करण्यात आले. मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस भेट दिली व शिवमहापुराण कथेस आलेल्या भाविक भक्तांचे चाकरवाडी येथे स्वागत केले.

तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी शिवमहापुराण कथेस व माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास आलेल्या भाविक भक्तांना आशिर्वाद दिले. सर्वांनी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात नामस्मरण, अभंग संकीर्तन,शिवम हापुराण कथेचा लाभ घ्यावा असे महादेव महाराज तात्या यांनी आव्हान केले .सद्गुरु संत ज्ञानेश्वर माऊली दादाच्या जय जय घोष व हर हर महादेव जय घोषणे आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील भक्तीच माहेरघर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ▶▶ उर्वरित पान २ वर






# शिवरायांप्रतीचा आदर आचरणातही दिसावा !

शिवजयंती आणि शिवराज्याभिषेक दिन हे समस्त शिवभक्तांच्या जीवनातील प्रमुख उत्सव. यंदा पावसाळा असतानाही किल्ले रायगडावर शिवभक्तांच्या अफाट सागर लोटलेला पाहायला मिळाला. आपल्या प्रगल्भ बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शहा देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे.



जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

### जेते नेते..

*महत्वाकांक्षी नेत्या*
*बाजूस सारले जाते*
*भरडला जातो नेता*
*भरारा फिरते जाते*

*अवैध धंद्या सोबती*
*रे जोडले जाते नाते*
*उंच शिखरे स्पर्शता*
*दरीत कोसळले नेते*

*हा हंत हंत हे पतन*
*होण्याचे नव्हते होते*
*कुठून येतात पुरावे*
*भरभरून मिळेपोते*

*अंत:स्थ छुपे शत्रुत्व*
*पुरवत राहती जे ते*
*विजयश्रीमिरवणारे*
*सहजी हरतात जेते*

*हळूवार बाजू काढा*
*काटे पायाशी सलते*
*अंगाशी येवू लागते*
*धाडस केलेलेभलते*

*तुरूंगा पडे खितपत*
*काम करायचे फत्ते*
*घोटाळूलागे पायाशी*
*भुंकत राहणारे कुत्ते*

*इति श्री राजकारणी*
*उलटंसुलटं असे पत्ते*
*महत्व असे चालीला*
*खोडसाळ बुध्दीमत्ते*

*- हेमंत मुसरीफ*
*पुणे.*

## सणांवर विनोद करू नका !

आताचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. तरुणाई दिवसातील आपला बराच वेळ हा सोशल मीडियावर व्यतीत करत असते. सण-उत्सव जवळ आले की त्याविषयी जशा माहिती देणाऱ्या रिल्स सोशल मीडियावर येऊ लागतात तशा त्या सण-उत्सवांवर विनोद करणाऱ्या, सणांविषयी गैरसमज पसरवणाऱ्या रिल्स आणि व्हिडीओज सोशल मीडियावर फिरू लागतात. वटपौर्णिमा जवळ आल्याने वटपौर्णिमा सण साजरा करण्यामागील शास्त्र अथवा या सणाचे महत्व लक्षात न घेता त्यावर फालतू विनोद करणाऱ्या अनेक रिल्स सध्या मोबाईलवर येऊ लागल्या आहेत. हिंदू असूनही आपल्याच सणांवर विनोद करणाऱ्या त्या रिल्स पाहून आपण हसत आहोत आणि त्या इतरांनाही पाहण्यासाठी फॉरवर्ड करत आहोत. वटपौर्णिमा झाली की सण-उत्सवांना सुरुवात होते. सृष्टीत होत जाणारे बदल तसेच धर्मग्रंथातील सत्यकथा यांचा आधार हिंदू धर्मातील सण आणि उत्सवांमागे दडलेला असतो. प्रत्येक गोष्ट ही ईश्वराचेच रूप असून जीवसृष्टीसह निर्जीव वस्तूतही त्याचे अस्तित्व असते त्यामुळे या सर्वांचा सन्मान करण्याची शिकवण या सणांच्या माध्यमांतून आपल्याला मिळत असते. वटपौर्णिमेला वडाला म्हणजेच वृक्षाला पुजले जाते. नागपंचमीला नागाला, तर पोळ्याच्या दिवशी बैलाला पुजले जाते. दसऱ्याच्या दिवशी वापरातील उपयुक्त शस्त्रांचे आणि वस्तूंचे पूजन केले जाते. पितृपक्षाच्या निमित्ताने कावळ्याच्या रूपाने पूर्वजांना घास भरवला जातो. अशाप्रकारे चराचरावर निरपेक्ष प्रेम करायला शिकवणारे हिंदू धर्मातील सण हिंदू धर्माचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून सणांविषयी न मिळणारे ज्ञान यांमुळे हिंदूंच्या सण-उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना यांना फारसे वावगे वाटत नाही; मात्र ज्यांना आपले सण आणि उत्सव याविषयीचा सार्थ अभिमान आहे त्यांनी अशा रिल्स किंवा व्हिडीओज पुढे न पाठवता ते पाठवणाऱ्यांना सणांमागील शास्त्र सांगावे,

– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

## पान १/४ वरून पुढे...

### माऊली दादाच्या...

शिवमहापुराण कथेस सुरुवात झाली पहिल्याच दिवशी भाविक भक्तांचा महापूर चाकरवाडी येथे आला, सुमारे ३ लाख पेक्षा अधिक जनसागर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथेस उपस्थित होते. संत महंतांच्या उपस्थितीत शिवमहापुराण कथेस तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प. पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा सुरू झाली पुढील सात दिवस शिव महापुराण कथा सुरू राहणार आहे भाविक भक्तांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले.

### सखोल तपासणी...

केला या निकालामध्ये मा. विभागीय आयुक्तांनी असे म्हटले आहे की, मोठेवाडी गावातील झालेल्या विकास कामांमधील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अहवालानुसार माजी सरपंच श्री. अविनाश विश्वनाथ गोंडे व तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी श्री.ए.टी. शिरसाट यांनी ग्राम पंचायतीचे कामकाज करताना जमा खर्चास मान्यता न घेणे, ५०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कमेची पोच देताना महसुल मुद्रांक न वापरणे, कामे करताना अंदाजपत्रकास मान्यता न घेणे, निवीदा अथवा दरपत्रके न मागवता विकास काम करणे, त्यांची आवश्यक अभिलेखे जतन न करणे, देयके रोखीने अदा करणे अशा अनियमीतता केल्यामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता २०११ मधील तरतुदीचे पालन न केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक १२/०९/२०२४ व दिनांक १३/०१/२०२५ च्या चौकशी अहवालावरुन स्पष्ट होते, अनियमीततेसाठी तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी श्री.ए.टी. शिरसाट यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उक्त अहवालावरुन स्पष्ट होते.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, सखोल तपासणी करुन अपहारीत रक्कम निश्चित करुन, व्याजासह वसुल करुन शासनखाती भरणा करण्याची कार्यवाही एक महिन्याच्या आत करण्यात यावी. असा निकाल विभागीय आयुक्त. छत्रपती संभाजी नगर, यांनी दिलेला आहे.

### प्राथमिक शिक्षणाधिकारी...

केली आहे. या प्रकरणात सखोल चौकशी करून संस्था चालकावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. या पूर्ण प्रकरणात शिक्षण विभागाच्या दुर्लक्षाची भूमिका स्पष्ट दिसून येते. शिक्षणाधिकारी यांची या प्रकरणात चौकशीसह स्पष्ट भूमिका अपेक्षित असून बोगस शाळा चालवणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक बनले आहे. मागील आठ दिवसापूर्वी या शाळे विरोधात प्राथमिक शिक्षणाधिकारी फ

## पान ४ वरून पुढे...

ुलारी यांनी चौकशी समिती नेमली होती तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद प्राथमिक विभागातील दोन विस्तार अधिकाऱ्यांकडे देण्यात आले होते. एक आठवडा उलटल्यानंतरही या शाळेचा अहवाल सादर न झाल्याने फ ुलारी व टीम नेमके काय करत आहे ? असा प्रश्न उपस्थित होत असून विभागीय स्तरावर भ्रष्टाचाराचा आरोप झालेले प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी हे बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या बोगस शाळांचा भ्रष्टाचार उघड करणार का ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून शहरात सुरू असलेल्या या बोगस शाळेविरोधात प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी काय भूमिका घेणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यातील अशा प्रकारच्या संस्थांमुळे शिक्षण व्यवस्थेचा दर्जा खालावत असून विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे. त्यामुळे पालक, शिक्षक, आणि समाज यांनी सजग राहून अशा संस्थांविरोधात एकत्रित पाऊले उचलण्याची गरज आहे.

### सुधारगृहातून पळून...

अधिकारी psi चव्हाण यांना सदर ठिकाणी तात्काळ पाठवून त्या दोन्ही अल्पवयीन मुलींना थांबवून ठेवले, व शिवाजीनगर पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक पवार यांना फोन करून माहिती देत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथील स्टाफ बोलावला. दोन्ही मुली पुन्हा स्वाधारगृहात दाखल करण्यासाठी शिवाजीनगर महिला पोलिसांचे ताब्यात दिल्या. त्यानंतर त्या महिला स्वाधारगृहाचे यांचेमार्फतिने अध्यक्ष बालकल्याण समिती यांच्याकडे हजर करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांचे म ार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण व शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे कळ १६६४ रविंद्र गोवर्धन आघाव, LHC १०३४ शीतल केशव जोगदंड Pc २०७७ बाळु बाजीराव राहाडे Pc २७३ नवनाथ बंडू डाके यांनी केली आहे.

### अंबाजोगाई बकरी...

सुंदर उदाहरण ठरले. काकाजी व अक्षयभैय्यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहर ही एकतेचे प्रतिक आहे. इथले सामाजिक सलोख्याचे वातावरण हेच आपली खरी ओळख आहे. शहरातील विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि युवा वर्गही या कार्यक्रमास उपस्थित होता. सणाच्या निमित्ताने शहरात शांतता, आनंद व सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### घरकुल लाभार्थ्यांना...

जणांनी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून मोफत वाळूसाठी पात्र झाले

## पान ४ वरून पुढे...

आहेत. शुक्रवारी (ता. सहा) तहसील कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आलेल्या एका कार्यक्रमात घरकुलच्या पात्र लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटपाचे कार्ड देण्यात आले. यावेळी जवळपास ८० लाभार्थी या कार्यक्रम ाला उपस्थित होते. सर्व प्रक्रिया पूर्ण केलेल्या या लाभार्थ्यांना महसूल विभागाने गंगामसला येथील गोदावरी नदीपात्रात निर्माण केलेल्या वाळू घाटावरून मोफत पाच ब्रास वाळूचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, अभियंता विष्णू जाधव, विस्तार अधिकारी आदी उपस्थित होते.

### गेवराई ते भोगलगाव....

येण्यासाठी बससेवा उपलब्ध नसल्यामुळे भोगलगाव ग्राम स्थ,विद्यार्थी, वृध्दांना कामासाठी गेवराईला जाणे शक्य होत नाही येथिल नागरिकांना अत्यंत हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना परीक्षांच्या काळात गावाबाहेर जाण्यास व येण्यास वाहतुक उपलब्ध नसल्यामुळे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत गावकऱ्यांनी वारंवार अर्ज निवेदन देऊनही बससेवा सुरू केली नाही. त्यामुळे मौजे भोगलगाव याठिकाणी सकाळी ७:३० ,दुपारी २:०० ,सांयकाळी ६:०० यावेळेत तात्काळ बससेवा सुरु करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना तालुका प्रमुख उद्धव मडके यांनी गेवराई आगार व्यवस्थापक यांना दि. ८ जून रोजी दिले आहे. सदर बससेवा आठ दिवसात चालू न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात शिवसेना गेवराई तालुका प्रमुख उद्धव मडके यांनी दिला आहे. यावेळी शिवसेना गेवराई शहरप्रमुख मुकेश महाजन, शहर संघटक सुनील मोटे, उमेश शिंदे, गणेश पवार यांच्या सह शिवसेना पदाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'आमदार श्री...

जयशिंग गव्हाणे, मा.सरपंच अनिल ढोबळे,विस्तार अधिकारी म नोरंजन धस,चेअरमन मारुती पठाडे,महेश शिंदे,रावसाहेब शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी त्यांना घडवणारे शिक्षक आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळा यांना आगामी वर्षापासून आमदार श्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे अशी घोषणा आमदार सुरेश धस यांनी केली. उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांसाठी आमदार चषक स्पर्धा सुरू करणार ज्यामुळे गुणवत्तेसाठी स्पर्धा सुरू होईल गुणवंत विद्यार्थी हे देशाचे आधारस्तंभ आहेत त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन स्वतःचे आई वडिलांचे शाळेचे व आपल्या तालुक्याचे नाव उज्वल करावे.

आष्टी तालुका हा गुणवंतांची खाण आहे. यूपीएससी परीक्षेत मतदार संघातील चार विद्यार्थी आयएएस व आयएफएस म्हणून निवडले गेले

## पान ४ वरून पुढे...

आहेत.आणि या वर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून पुढील विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी या गुण गौरव समारंभाचे आयोजन केले आहे असे प्रतिपादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारत हा विश्व गुरु व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी संशोधन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे त्याचबरोबर आर्थिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी त्याही क्षेत्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता असून केवळ नोकरीच्या मागे न लागता आपण माणूस म्हणून श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करावा आपल्या परिसरातील ऊसतोड कामगारांच्या हातातील कोयता बंद करण्यासाठी.. आणि त्यांच्या मुलांच्या जीवनात हा प्रसंग येऊ नये यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या असल्यामुळे त्या शाळांचे शिक्षण दर्जेदार होण्यासाठी जरेवाडी पॅटर्न राबवण्यास आपण सुरुवातीपासून प्रयत्न केले असल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ झाली असून हजारो विद्यार्थी पुन्हा जिल्हा परिषद मध्ये आले आहेत असे सांगितले. या गुणगौरव कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून तालुक्यातीलच रहिवासी असलेल्या कु.अश्विनी देवराव परकाळे आय.एफ. एस. यांनी स्पर्धा परीक्षे विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चिकाटी सातत्य आणि गोरगरीब आई-वडिलांना समोर ठेवून कष्ट करावे त्यातून यश प्राप्त होते असा मौलिक सल्ला आ. धस यांनी शेवटी बोलताना दिला.यावेळी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करून आयएफएस झालेल्या अश्विनी देवराव परकाळे यांनी विद्यार्थ्यांना यशाची गुरुकिल्ली दिली. तसेच अभ्यासातील बारकावे समजावून सांगत सविस्तर मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सुरेश पवार, मनोरंजन धस, सूर्यकांत मोकाशे, महेश शिंदे, आप्पा काळे, सतीश दळवी, सोमनाथ वाळके, विकास धस,दीपक सोले, सचिन रानडे, सोमनाथ भोसले,वाघमारे, नरवडे,संतोष पोकळे, थोरात,जेवे,अनंत्रे, काकडे, लगड,

गणेश शिंदे, राजु शिन्दे ऋषी खिळे, .गण प्रमुख अशोक दहातोंडे,शिवाजी थोरात,विलास सिरसाठ ,वायभासे, रामदास शेंडगे, राहुल सुरवसे,राजु खुरांगे ,अतुल खराडे,भाऊ झांजे,रामेश्वर चव्हाण,बिट्टु पोकळे,संजय पाटील,संजय ढोबळे,अन्सार शेख ,ईस्लाम शेख, संदीप कारंजकर, विठ्ठल गर्जे ,विजय मरकड ,धनंजय तरटे,उद्धव बेंद्रे ,खंडु जाधव, शिवाजी घुले ,रावसाहेब मुटकुळे , देविदास साप्ते ,दत्ता गर्जे ,मंजुर शेख,निशांत जेवे प्रविण झांबरे, किशोर झरेकर आदींनी परिश्रम घेतले.

या गुणगौरव सोहळ्याचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी मनोरंजन धस यांनी केले.

### भूजल सर्वेक्षण....

विकास यंत्रणा पाणी कसे तपासते याबाबतची माहिती करून घेण्यात यावी बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी प्रयोगशाळा सर्वांना माहिती घेण्यासाठी उपलब्ध आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# तीन लाख देऊन आणलेली बायको निघाली एका मुलीची आई

## पैसेही गेले आणि बायकोही, दोनच दिवसात संसार मोडला

**वडवणी । प्रतिनिधी**

मी अशिक्षित दीड एकर खडकाळ जमीन. आमचे आयुष्यच ऊसतोडणीत गेले. आता २८ वर्षांचा झालो. दोन–तीन वर्षांपासून लग्नासाठी बायको पाहतो, पण भेटलीच नाही. मजूर असलो म्हणून काय झाले. मी पण माणूसच. मलाही बायको पाहिजे ना? म्हणूनच बायकोसाठी तीन लाख रुपये दिले. परंतु आमचा संसार दोन दिवसांचाच राहिला आणि बायको निघून गेली. पोलिसांनी तपास केल्यावर ती पाच वर्षांच्या एका मुलीची आई असल्याचे समजले. आता काय, पैसेही गेले आणि बायकोही. पुन्हा मी एकटाच... अशी व्यथा दोन दिवसांपूर्वी फसवणूक झालेल्या तरुणाने मांडली. राहुल (नाव बदलले रा. वडवणी) याची घरची परिस्थिती गरीब. आई–वडील, मोठा भाऊ आणि राहुल हे सर्वच ऊसतोडणी करतात. मागील वर्षी कर्नाटकात गेल्यावर त्याची ओळख यमुनाबाई शिंदे (रा. सेलू, जि. परभणी) हिच्यासोबत झाली. राहुलने तिच्याजवळ बायको पाहिजे म्हणून आशा व्यक्त केली. त्याप्रमाणे ३१ मे रोजी यमुनाबाई हिने राहुलला कॉल करून सेलूला मुलगी पाहायला बोलावले.

त्याच दिवशी मुलगी पसंद करून ते परत गावी आले. त्यानंतर १ जून रोजी मंदिरात विवाह लावला. दुसरा दिवस देवदर्शन झाल्यानंतर ३ जून रोजी सत्यनारायणाची पूजा झाली.

पाहुणे जेवण करत होते. तेवढ्यात नवरीने मैत्रिणीला कॉल करून त्रास होत असल्याचे सांगितले. काही क्षणातच पोलिस घरी आले. त्यानंतर सर्व चौकशी केली असता, नवरी आणि तिचे नातेवाईक बनावट असल्याचे समजले. त्यावरून वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

**● कोणाचा काय रोल ?नवरी – वैभवी राम शेटे (रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर), मध्यस्थी – यमुनाबाई शिंदे (रा. सेलू, जि. परभणी), नवरीचे काका – मावशी – उमेश राठोड, चंदा उमेश राठोड (रा. अकोला), वाहन चालक – रणजीत उत्तम आहेर, नवरीची मैत्रीण – मनीषा नरेंद्र नन्नवरे (दोघेही रा. संगमनेर)**

राठोड दाम्पत्यास अडीच, तर मध्यस्थीला ५० हजार३१ मे रोजी मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर १ जून रोजी राठोड दाम्पत्य आणि यमुनाबाई शिंदे हे राहुलच्या घरी आले. दुपारच्या सुमारास यमुनाबाईकडे ५० हजार, तर राठोड दाम्पत्याने अडीच लाख रुपये घेतले. त्यांच्यासोबत वैभवीदेखील होती. तिला सोडून बाकीचे परत गेले. हे सर्व पैसे मुकादमाकडून उचल म्हणून घेतले होते. आगामी हंगामात ऊसतोडणी करून ते परत करणार होतो, असे राहुल म्हणाला.



**● या टोळीचा काय असतो प्लॅन ? लग्नाळू तरुणांना शोधायचे**

**त्यांच्या नातेवाइकांना संपर्क साधून भावनिक करायचे. नंतर लग्न करून एक–दोन दिवस सासरी थांबायचे. नंतर घरचे लोक किंवा इतर नातेवाईक आजारी असल्याचे सांगून पैसे उकळायचे. जर हे यशस्वी झाले नाही तर सासरचे लोक त्रास देत आहेत, असे म्हणून पोलिस ठाणे गाठायचे. या प्रकरणातही वैभवीने मैत्रीण मनीषाला असेच सांगून बोलावून घेतले होते. परंतु सर्वांची वेगवेगळी चौकशी केल्याने या टोळीचा भांडाफोड झाला. आता चौघेजण पोलिस कोठडीत आहेत, तर राठोड दाम्पत्य फरार आहे.**

## औंढा नागनाथ येथून अपहरण झालेल्या व्यक्तीची तेलगाव येथे सुटका





### दिंद्रुड पोलिसांची कारवाई ; आरोपी अटक

**बीड । प्रतिनिधी**

स्थागुशा बीड येथिल पोउपनि श्रीराम खटावकर यांनी दिंद्रुड पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे यांना माहिती दिली की, जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथुन एक इसमाचे अपहरण करण्यात आले असुन त्यास काही इसमानी एीर्टीळसर कार क्रमांक MH 44 E 1191 मध्ये टाकुन घेउन गेले असुन त्यांचे लोकेशन पात्रुड ता. माजलगाव येथे आले आहे. त्यावेळी सोपनि ढाकणे यांनी तात्काळ पो. स्टे. दिंद्रुड येथिल पोशि २१७५ साळुंखे, पोशि ३६० गायकवाड, चापोशि १६७० बनसोडे अशांना तेलगाव येथे पाठवून नमुद वर्णनाच्या कारचा शोध घेण्याचे सांगीतले असता. पोलीस पथकाने दुपारी १५.१५ सुमारास तेलगाव येथे स्थानिक नागरीकांच्या मदतीने नमुद कार थांबवून अपहरण झालेला इसम नामे बळिराम लिंबाजी सांवत तसेच अपहरण करणारे इसम नामे नामदेव माणिक घोळवे रा. अंबेवडगाव ता. धारूर, श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, परभणी ह.मु. जवळा बाजार ता. औंढानागनाथ जि. हिंगोली बाबुराव गोविंदराव बडे रा. कसारी ता.धारुर अशाना त्यांचे कडील वाहन क्र. चक ४४ ए ११९१ सह ताब्यात घेवुन पो.स्टे. दिंद्रुड येथे आणले. चौकशीनंतर समजले की पैशाच्या व्यवहारातून यातील आरोपी श्रीमती नागराबाई सुदाम तोंडे रा. धार रोड, परभणी ह.मु. जवळा बाजार ता. औंढानागनाथ जि. हिंगोली हीने तीच्या साथीदारांच्या मदतीने बळिराम लिंबाजी सांवत याचे अपहरण केले होते.

अपहरण झालेल्या व्यक्तीस वर अपहरणकर्त्यांनी मारहाण केल्याने त्रास होत असल्याचे सांगितल्याने बळीराम लिंबाजी सांवत याचेवर सरकारी दवाखाना येथे औषधोपचार करण्यात आले. आरोपी व पिडीत इसम यांची माहिती पोउपनि महादेव जिवारे पो. स्टे. औंढानागनाथ जि. हिंगोली यांना देण्यात आली. औंढानागनाथ येथील तपास पथक दिंद्रुड येथे आल्यानंतर पिडीत व्यक्ती, आरोपी व गुन्हा करणेकामी वापरलेली कार त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोशि २१७५ साळुंखे, पोशि ३६० गायकवाड, चापोशि १६७० बनसोडे यांनी केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जागृत देवस्थान चारदरी येथे मारुतीराया यांची महाआरती केली व वडवणी येथे सत्कार समारंभ संपन्न झाला व ढेकनमोहा येथे पसायदान प्रकल्प अनाथ मुलांचे यांना खाऊचे वाटप केले व प्रसिद्ध देवस्थान वायबट वाडी येथे मारुतीरायांची महारती केली व प्रसिद्ध देवस्थान पेंडगाव येथे मारुतीरायांची महारती केली व हॉटेल गोल्डन चॉईस येथे सत्कार समारंभाचा कार्यक्रम उपस्थित असलेले नाळवंडी सर्कलचे माजी जिल्हा परिषद राजेंद्र अण्णा राऊत व शिवराज बांगर सर तसेच उद्योजक रमेश आजबे साहेब शेळके साहेब अनुरथ फौजी तसेच नवनाथ घुगे सर साहेबराव पोकळे वीर बिल्डर रितेश जाधव तांदळे भैया ढवळे सरपंच इत्यादी सर्वांची उपस्थिती झाला व सर्वांनी भोजनाचा आनंद घेतला व माझी सर्व सहकारी मित्र परिवार यांनी युवा नेते बप्पासाहेब घुगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचा व महाप्रसादाचा माजलगाव मतदारसंघातील भाविकांनी लाभ घ्यावा : मोहनराव जगताप

**माजलगाव । प्रतिनिधी**



श्री क्षेत्र चाकरवाडी येथील वैकुंठवासी संत माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ श्री क्षेत्र चाकरवाडी येथे सुरू असलेल्या पुज्य पंडित प्रदीप मिश्राजी यांच्या श्रीमुखातून महाशिवपुराण कथा ऐकण्याचे अभूतपूर्व असे आयोजन करण्यात आले आहे. ही कथा ऐकण्यासाठी भाविक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणार आहेत. तसेच माजलगाव बस स्थानक येथून १४ जून पर्यंत सकाळी ७:३० ते ९ वाजेपर्यंत तसेच परत येताना सुद्धा बसची सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे. माजलगाव तालुक्यास या अभूतपूर्व शिवपुराण कथेच्या कार्यक्रमाची सेवा करण्याचा मान ९ जून सोम वार रोजी मिळालेली आहे, यावेळी दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघातील भाविकांनी या महाशिवपुराण कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा छत्रपती सह. साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केले आहे.

## भव्य अश्व रिंगण सोहळा २०२५

### भावी पिढी सुसंस्कारित होण्यासाठी वारकरी दिंडी नृत्य स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा : स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



सर्व भाविक भक्तांना शालेय विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराज नरसी नामदेव व संत श्रेष्ठ जनाबाई गंगाखेड यांच्यासह अनेक पालख्या या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात यानिमित्ताने संपूर्ण मराठवाड्यातील पहिले ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण आपल्या अंबाजोगाई मध्ये संपन्न होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य मैदानावर पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या गटांमध्ये भव्य वारकरी दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. आपल्या लहान मुलांवर भारतीय संस्कृतीचे विशेष करून वारकरी सांप्रदायाचे संस्कार रुजावेत. तसेच वारकरी संप्रदायाच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभाव जोपासला जावा, त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची सत्प्रवृत्ती निर्माण व्हावी यासाठी या स्पर्धेचे विशेष करून आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी तिन्ही गटांमध्ये प्रथम पारितोषिक ३१००/– रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र द्वितीय पारितोषिक २००१/– रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र तृतीय पारितोषिक १००१/– रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ ५००/– रुपये प्रमाणपत्र प्रत्येकी दोन याप्रमाणे ठेवण्यात आलेले आहेत. हजारो वारकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य अश्व रिंगण सोहळा गुरुवार दिनांक २६ जून २०२५ गुरुवार रोजी संपन्न होणार आहे. याच दिवशी शालेय वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धा स्पर्धा दुपारी ठीक बारा वाजता योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होतील अंबाजोगाई शहरातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी. वारकरी दिंडी मध्ये वारकरी पोशाखा सोबतच विविध संतांचा पोशाख असणे अभिप्रेत आहे.

## महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये शिवस्वराज्य दिन उत्साहात

**वडवणी । प्रतिनिधी**

संस्कार शिक्षण मंडळ,वडवणी संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शुक्रवार दि.६ जून २०२५ रोजी शिवस्वराज्य दिन मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की,छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक करून लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ६ जून शिवराज्याभिषेक दिन हा महाराष्ट्र शासनाने २०२१ पासून शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे यावर्षी ३५२ वा शिवस्वराज्य दिनानिमित्त वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारून राष्ट्रगीत,राज्यगीत गायन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करून शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर,मराठी वाङ्मय विभाग प्रमुख श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,श्री.घोळवे सर,श्री.निवरकर सर,श्री.चांदणे सर,प्रा.कांबळे सर,प्रा.मुंडे सी. व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा. डाके सर,प्रा.केदार सर,श्री.सावंत सर,श्रीमती फलके मॅडम,श्रीमती घुले मॅडम,श्रीमती दिव्या मॅडम,प्राध्यापिका कचरे मॅडम, प्राथमिक उघडे मॅडम यांच्यासह विद्यालयातील शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीत माजी विद्यार्थ्यांची 28 वर्षांनी पुन्हा भरली एकदिवसाची शाळा

## १९९७ दहावी बॅच मधील विद्यार्थी विद्यार्थिनीनी दिला जून्या आठवणींना उजाळा; गुरूवर्य शिक्षकांना सन्मानपत्र देऊन केला गौरव

**आष्टी । प्रतिनिधी**

तब्लल २८ वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची पुन्हा एकदा आष्टीत शाळा भरली. बेचाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी शाळेतील बाकांवरच्या मित्र–मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. निमित्त होते आष्टी शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळा आष्टी,श्री गणेश विद्यालय आष्टी,पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या चार शाळेतील इयत्ता दहावीच्या १९९७ वर्षातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे गेट–टुगेदर स्नेहसंमेलन शनिवार दि.७ जून रोजी आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स येथे पार पडले.यावेळी तब्बल चार शाळेतील २० गुरूवर्य शिक्षकांना साल,सन्मानपत्र,गुच्छ देऊन गौरव करण्यात आला.



या गेट–टुगेदर स्नेहसंमेलनात तब्बल १२० विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.तर २० शिक्षक व शिक्षीका यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या अगोदर काही शिक्षकांचे निधन झाले अशांना व बॅचमधील ज्या मित्रांचे दुर्दैवाने निधन झालेली आहेत अशा सर्व मित्र–मैत्रिणींना व युद्धातील शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात केली.

तब्बल २८ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांना एकमेकांना पाहून खुप आनंद वाटला. सर्व विद्यार्थी आपापल्या विविध क्षेत्रात काम करत असून आजच्या कार्यक्रमासाठी वेळ काढून हे सगळे विसरून फक्त सर्व विद्यार्थी म्हणूनच एकत्र आले होते. या गेट–टुगेदर साठी जवळजवळ पंधरा ते वीस दिवसांपासून सर्व स्थानिक विद्यार्थी यांचे नियोजन चालू होते. आज त्या नियोजनाला मूर्तीमंत रूप आले. तब्बल एक वर्षांपूर्वी सर्व दहावीच्या १९९७ च्या बॅचने एकत्र येण्याची संकल्पना आष्टी येथील चार हि शाळेतील मित्रांनी बोलून दाखवली होती. व त्यासाठी सर्वच जण सतत कार्यरत असलेले स्थानिक मित्र–मैत्रिणी यांना कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून कार्यक्रमाचे आयोजन कसे चांगले करता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. जवळजवळ महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात विद्यार्थी राहत असल्यामुळे सर्वांचे नंबर कलेक्ट करणे त्यांना वेळोवेळी कॉन्टॅक्ट करून कार्यक्रमाविषयी आस्था निर्माण व्हावी यासाठी वेळोवेळी संपर्क साधून १९९७ बॅच हा व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला व त्या ग्रुपवर नंतर सगळ्या मित्रांना ॲड करून ग्रुप चालू झाला व त्यावर गेट–टुगेदर च्या कार्यक्रमाची सूचना व फायनल तारीख सर्वांच्या मते ठरवण्यात आली. तो आनंदाचा दिवस उजाडला कार्यक्रमाचे ठिकाणी विद्यार्थी पोहोचल्यावर प्रथम त्यांच्याकडून स्वतः सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणची माहिती रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली.त्यानंतर सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना फेटा बांधून वाजत गाजत शाळेसारख्या लाईनीमध्ये लॉन्समध्ये प्रवेश करून कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यात सर्वांचा परिचय करून घेण्यात आला. त्यानंतर काही शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सकाळी नाश्त्याचा कार्यक्रम झाल्यानंतर व दुपारी भोजनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर दुपारच्या सत्रातही. या सगळ्या गोष्टींमध्ये सर्व विद्यार्थी आपलेआजचे वय सध्या जगण्याची सगळे टेन्शन विसरून खरंच परत एकदा त्या काळातील विद्यार्थीच झाले होते.त्यांच्या चेहऱ्यावरच्या आनंद दिसत होता. सगळे एकमेकांना जुन्या गोष्टीची आठवण करून देऊन जुने किस्से सांगत होते.यानंतर सर्वच विद्यार्थ्यांनी डिजेच्या विविध गाण्यांवर मनसोक्त नाचण्याचा आनंद लुटला. आणि सर्व विसरूनच गेले होते जणू २८ वर्षात राहिलेल्या सर्व गोष्टी जणू सर्व विद्यार्थी आजच्या कार्यक्रमात भरूनच काढत होते.हा गेट–टुगेदरचा कार्यक्रम सुरळीत व्हावा यासाठी स्थानिक विद्यार्थी राजीव नरवडे,अविनाश कदम,शरद रेडेकर,राजु गोल्हार, राहुल भोसले, प्रितम कासवा, संतोष कदम,शरद गायकवाड,डॉ रामदास सानप,राजु कारंडे,राहुल निकाळजे,शहादेव धनवडे,महेश टेकाडे,रोहिदास पवार,अमृत वाढरे, नितिन सायकर, डॉ प्रियंका हंबर्डे,अश्विनी निबोरे,मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर,अर्चना पांडव,अंबिका जगताप,रूपाली मेहेर, प्रियंका मेहेर,चंदा धनवडे,हारूबाई सुळे यासह सर्व विद्यार्थी मित्रांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षक संपत गायकवाड हे होते.यावेळी शिक्षक प्रल्हाद काळे,महादू शिंदे, लहु करपे,वामण निकाळजे, शिक्षिका विजया संत्रे, मुक्ता बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले शेवटी अध्यक्ष भाषण संपत गायकवाड यांचे झाले.

तर विद्यार्थी मधून डॉ मुकुंद विधाते, प्रकाश हंबर्डे, डॉ फेरोज तांबोळी,प्रितम कासवा,शरद रेडेकर,अतुल मुळे व विद्यार्थीनींनी मधून डॉ प्रियंका हंबर्डे, मनिषा शिंदे,अनुप्रिता मेहेर यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल निकाळजे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी तर आभार अविनाश कदम यांनी मानले.व या धावपळीच्या जगात वर्षातून एकदा तरी सर्व मित्रांनी एकत्र येण्याचे ठरवून कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या व आनंदात यशस्वीरित्या पार पडला.व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### २० शिक्षकांना सन्मानपत्र देऊन केला गौरव

**शिक्षक संपत गायकवाड, पोपटराव भोसले,अशोक काकडे, रामराव चव्हाण, प्रल्हाद काळे, महादू शिंदे, चांगदेव सातव, लहु करपे,वामन निकाळजे, रमेशसिंह देसुरकर, जी.एम भागवत, भाऊसाहेब जगताप, सुनील काकडे, दादासाहेब खाडे, मधुकर सोळसे,संभाजी नवसुपे, शिक्षिका विजया संत्रे, मंगलप्रभा गर्जे,निर्मला सोले, मुक्ता बनसोडे या २० शिक्षक गुरूवर्य यांना साल, गुच्छ, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.**

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

सोमवार, दि.०९ जून २०२५ पान ४

## मोठेवाडी ग्रामपंचायत मधील कामाची सखोल तपासणी करून अपहाराची रक्कम व्याजासगट एका महिन्यात वसूल करण्याचे विभागीय आयुक्तांचे आदेश

## सखोल तपासणी कडे जिल्ह्याचे लक्ष

**माजलगाव। प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मोठ्या समजल्या जाणाऱ्या मोठीवाडी ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच अविनाश विश्वनाथ गोंडे आणि तत्कालीन ग्रामसेवक आनंदकुमार शिरसट यांनी ग्रामपंचायत मोठेवाडी येथे भ्रष्टाचार केला. या विषयावर अर्जदार डॉ. कुंडलिक रघुनाथ खेत्री यांनी विभागीय आयुक्त. छत्रपती संभाजीनगर यांच्या दालना मध्ये न्याय मागितला होता. याविषयी सविस्तर वृत्त असे की, या अर्जावर दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी शेवटची सुनावणी आयुक्तालाच्या दालनामध्ये पार पडली सदरील सुनावणीचा निकाल आयुक्तांनी राखीव ठेवला होता. दिनांक २९ मे २०२५ रोजी आयुक्तांनी निकाल जाहीर ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांना शाळेची चौकशी करण्यासाठी वेळ मिळेना !

### बीडमध्ये 'हजरत मन्सूर शाह' शिक्षण संस्थेचा बोगस कारभार उघड ! चौकशी समिती नेमल ; अहवाल मात्र गुलदस्त्यात

## पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी व जिल्हा परिषद चे दोन विस्तार अधिकारी चौकशी प्रमुख

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील शिक्षण विभागात गाजत असलेला भ्रष्टाचार उघड होण्याच्या मार्गावर आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्यावर कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केलाचा आरोप करण्यात आला असून विभागीय स्तरावर चौकशी समिती या दोघांच्या काराभाराची चौकशी करणार आहे. बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठा भ्रष्टाचार सुरू असून याकडे प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांचे दुर्लक्ष होत असून बीड जिल्ह्यात बोगस शाळांचा सुळसुळाट निर्माण झाला आहे.

हजरत मन्सूर शाह एज्युकेशन संस्था' या शिक्षण संस्थेच्या नावावर शहरात शाळा चालवल्या जात आहेत, मात्र या शाळा नेमक्या कुठे आहेत, याबाबत शिक्षण विभागाकडे कोणतीही स्पष्ट माहिती नाही. यामुळे संबंधित संस्थेवर बोगस शाळा चालवण्याचे आरोप होत आहेत. शाळेची मान्यता शहरातील कोणत्या भागासाठी आहे, हे स्पष्ट नसताना त्या परिसरात शाळेचे प्रत्यक्ष अस्तित्वच नाही. जर शाळा प्रत्यक्षात नसेल, तर त्वरित शाळेची चौकशी करून संस्था चालक व मुख्याध्यापक यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे. या संस्थेच्या निष्काळजी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे समोर आले आहे. बीड शहरात विविध ठिकाणी शाळा चालवल्या जात असल्याचा दावा करण्यात येतो, मात्र कोणत्याही ठिकाणी मुलांना आवश्यक त्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा दिल्या जात नाहीत. वर्गखोल्या, शौचालये, पिण्याचे पाणी, फर्निचर यासारख्या मूलभूत सुविधा देखील अपुऱ्या असल्याच्या तक्रारी आहेत. शाळेमध्ये शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना नियमित आहार दिला जात नाही. शासनाकडून येणाऱ्या पोषण आहाराचा वापर व्यवस्थित न होता त्याचा अपव्यवहार होत असल्याची शंका अनेकांनी व्यक्त ▶▶ उर्वरित पान २ वर

## सुधारगृहातून पळून गेलेल्या दोन अल्पवयीन मुली पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**



पोलीस ठाणे वडवणी येथील २० दिवसापूर्वी व पोलीस ठाणे दिंद्रुड येथील चार ते पाच महिन्यापूर्वी ०२ अपहरणाचे गुन्हे दाखल होते या गुन्ह्यामध्ये पीडिता असलेल्या ०२ अल्पवयीन मुली सरकारी महिला स्वाधार गृह बीड येथे दाखल होत्या. दिनांक ०७ जून २०२५ रोजी सकाळी या दोन्ही अल्पवयीन मुली महिला स्वाधार गृहातून पळून गेल्या. याची माहिती वडवणीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना मिळाली, अशा मुली शहराबाहेर गेल्या तर त्यांचा कुणीही गैरफायदा घेऊ शकतो याचे गांभीर्य ओळखून त्याचे शोधाबाबत अधिक तपास केला असता, या दोन्ही मुली विठ्ठल रखुमाई मंदिर, ग्रामसेवक कॉलनी बीड, परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यावरून वडवणीचे दुय्यम ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाई बकरी ईदनिमित्त मुस्लिम बांधवांशी सौहार्दाची भेट : काकाजी व अक्षयभैय्यांची उपस्थिती



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ईद उल अजहा म्हणजे त्याग, समर्पण आणि एकतेचे प्रतीक. या पवित्र सणानिमित्त अंबाजोगाई शहरातील ईदगाह मैदान आणि मर्कज मस्जिद येथे आज मोठ्या उत्साहात नमाज पठण करण्यात आले. शहरातील मुस्लिम समाजाने मोठ्या संख्येने एकत्र येऊन ईद उल अजहा साजरी केली.

या प्रसंगी आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा व युवानेते अक्षयभैय्या (भैय्यासाहेब) मुंदडा यांनी ईदगाह मैदान व मर्कज मस्जिद येथे भेट देत मुस्लिम बांधवांशी संवाद साधला व ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मुस्लिम समाजातील ज्येष्ठांपासून ते युवकांपर्यंत सर्वांनी त्यांच्या या सौहार्दपूर्ण भेटीचे मनापासून स्वागत केले. सामाजिक ऐक्य आणि एकमेकांच्या सण–उत्सवात सहभागी होण्याचे हे ▶▶ उर्वरित पान २ वर

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटपाचा शुभारंभ

### तहसील कार्यालयातील कार्यक्रमात ८० लाभार्थ्यांना दिले वाळू वाटपाचे कार्ड

**माजलगाव। प्रतिनिधी**



तालुक्यातील विविध योजनेतील घरकुल धारक पात्र लाभार्थ्यांना शासनामार्फत मोफत पाच ब्रास वाळू वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. शुक्रवारी (ता. सहा) तहसील कार्यालयाच्या सभागृहात आमदार प्रकाश सोळंके, तहसीलदार संतोष रुईकर यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना वाळू वाटपाचे कार्ड देण्यात आले.

शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार राज्यातील विविध योजनेतून घरकुल मिळालेल्या पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून पाच ब्रास वाळू मोफत देण्यात येत आहे. माजलगाव तालुक्यात विविध योजनेतून घरकुल मिळालेल्या लाभार्थ्यांनी यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केली आहे. आतापर्यंत तालुक्यातील ३२४ ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शरदजी झोडगे यांचा मुलगा व माझे वर्ग मित्र भैरवनाथजी माने यांच्या पुतणीच्या शुभविवाह प्रसंगी उपस्थित राहुन चि. प्रतापसिंह व चि.सौ.कां प्राजक्ता यांना पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा देताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री. परमेश्वर सातपुते, युवासेनेचे जिल्हाप्रमुख अभिषेकजी दिवे, डी.सी.सी बँकेचे प्रताप नाना माने, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रयजी नरनाळे, आप्पासाहेबजी माने, आदी मान्यवर उपस्थित होते.*

## गेवराई ते भोगलगाव बससेवा तात्काळ सुरु करा

### बससेवा सुरू न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करु: उद्धव मडके



**गेवराई । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना जाण्यासाठी बससेवा उपलब्ध होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे आठ दिवसात बससेवा सुरू न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करणार असल्याचा इशारा शिवसेना गेवराई तालुका प्रमुख उध्दव मडके यांनी दिला आहे. मौजे.भोगलगाव हे महामार्ग पासुन आठ किमी अंतरावर असून हामार्ग पुर्णपणे डांबरीकरण झालेला आहे येथे वाहतुकीस योग्य आहे. याठिकाणी विद्यार्थी हे मोठ्या प्रमाणात गेवराई शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येत असतात परंतु विद्यार्थी व नागरिकांना ▶▶ उर्वरित पान २ वर

### शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी शिक्षक आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांचा....

## 'आमदार श्री' पुरस्कार देऊन गौरव करणार : आ. सुरेश धस यांची घोषणा



**आष्टी । प्रतिनिधी**

जगातील वेगवान घडामोडी अभ्यास आणि नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक परिणाम लक्षात घेऊन अभ्यास करावा आणि आपले भवितव्य घडवावे असे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

आष्टी येथे अनिशा इंटरनॅशनल स्कूल येथील प्रांगणात तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभ सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून वन विभागामध्ये अधिकारी पदावर नियुक्त झालेल्या अश्विनी परकाळे जरेवाडी पॅटर्नचे संदीप पवार, गटनेते खंडू जाधव,श्रीहरी गीते, ▶▶ उर्वरित पान २ वर

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत पाणी तपासणी प्रयोगशाळा सामान्य नागरिकांना माहिती मिळण्यासाठी उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक ललीशवळींरींळेप दिवसाच्या निमित्ताने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणामार्फत दिनांक ९ रोजी विकास यंत्रणा मार्फत बीड जिल्ह्यातील नागरिकांना भेट देण्यासाठी जिल्हा प्रयोगशाळा व उपविभागीय प्रयोगशाळा सामान्य नागरिकांना प्रत्यक्ष भेट देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात याव्या सदर प्रयोगशाळा भेटीमध्ये कमीत कमी एक शाळा अथवा महाविद्यालयीन विद्यार्थी वर्ग कमीत कमी दहा संख्येमध्ये अथवा सरकारी कार्यालयातील कर्मचारी कमीत कमी दहा संख्येमध्ये यांना प्रयोगशाळेत भेट देण्याबाबत कळविण्यात येत आहे सदरील भेटीमध्ये प्रयोग शाळेमधील तपासणी करण्यात येणारे रासायनिक व जैविक घटक तपासणी करताना आवश्यक असणारी यंत्रणे उपकरणे प्रक्रियेची माहिती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणी मध्ये येणारे सुसूत्रता इत्यादी बाबतची माहिती देण्यात यावी प्रयोगशाळेत भेट देणाऱ्या घटास प्रत्यक्षात एक अथवा दोन संख्येमध्ये पाण्यातील घटकाची तपासणी करून दाखविण्यात यावी प्रयोगशाळेत जमा होणारे खाजगी पाणी नमुने मापक दरात प्रयोग शाळेमध्ये तपासणी करण्याची उपलब्ध असलेली सोय याबद्दल माहिती देण्यात यावी रोग शाळेत पोहोचविणे होणाऱ्या पाणी नमुन्याची प्रयोगशाळेतील नोंदणी प्रक्रिया प्रत्यक्ष तपासणी पश्चात पाणी नमुन्याच्या वरील दोन्ही नोंदी या सर्व प्रक्रियेबाबत माहिती देण्यात जागतिक ccreditation दिवसाचे औचित्य साधून प्रयोगशाळा भेट देणाऱ्या नागरिकांना प्रयोगशाळेची माहिती देण्यात येणार आहे प्रयोगशाळे वायात प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे तरी बीड जिल्ह्यातील सर्व नागरिक कर्मचारी विद्यार्थी महिलांनी मुलींनी या संधीचा लाभ घ्यावा व भूजल सर्वेक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK